वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-सोमवार दि.२९ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

## अजितदादा, बीड शहर अमृतपाणी पुरवठा योजना आणि भुयारी गटार योजनेचे तीनतेरा करणारे बीडच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बेशिस्त कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंत्याची तात्काळ बीडमधून हकालपट्टी करावी

### बीडच्या जीवन प्राधिकरण कार्यालयाला कायम स्वरूपी कार्यकारी अभियंता द्यावा तरच

# बीडची अमृतपाणी पुरवठा योजना आणि भुयारी गटार योजनेचे काम पुर्ण होतील

### अमृत पाणी पुरवठा योजनेत आज पर्यंत १०२ कोटी रूपये खर्च केले पण बीडकरांना महिन्यातुन दोनदाच पाणी मिळते

Email:- dailydivyawarta@Gmail.com
दिव्य वार्ता
Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता उद्या उपमुख्यमंत्र्यांना देणार निवेदन

### अजितदादा, या मस्तावलेल्या कार्यकारी अभियंता, उपअभियंता आणि शाखा अभियंत्यांनी भुयारी गटार योजनेतही १७.६० कोटी रूपये खर्च करून योजना बंद करून टाकली

### अजितदादा, बीडकर आज मोठी यातना भोगत आहेत, प्यायला पाणी नाही, पाणी व्हायला गटार नाही

### महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी हे महावितरणावर खापर फोडत आहेत पण या मस्तावलेल्या अधिकाऱ्यांनी सोलार प्रकल्प पूर्ण न करता ठेकेदारांना (कपनी) ला अदा केले करोडो रूपयांचे बिल

बीड, (दिव्य न्युज):- बीड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्याच सोबत शहराला लागून असलेल्यांचीही संख्या मोठी आहे. या बीड शहरातील आणि आजुबाजुच्या परिसरातील नागरीकांना दररोज स्वच्छ आणि समृध्द पाणी मिळावे. हा दृष्टीकोन नजरेसमोर ठेवून केंद्र सरकार आणि राज्यसरकारने बीड शहराला तब्बल ११४ कोटी रूपये देवून योजना मंजूर केली. योजना पूर्ण झाल्यानंतर बीड शहरवासियांना मुबलक आणि स्वच्छ पाणी मिळेल याच आशेने ही योजना शासनाने मंजूर केली. पण तत्कालीन नगरपालिकेतील सत्ताधाऱ्यांनी नगर पालिकेत असणाऱ्या त्यांच्या विरोधकांच्या जिरविण्याच्या प्रयत्नातून ही योजना बीडच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग केली. ही योजना या प्राधिकरणाला मलिदा मिळाल्यासारखीच मिळाली.





प्राधिकरणाने या योजनेचा बट्टयाबोळ केला. तीन ते चार वेळेस या योजनेचे काम करणारे ठेकेदाराला मुदतवाढ दिली. तरी सुध्दा ही कामे आजतागयत पूर्ण झालेले नाही. तब्बल १०२ कोटी रूपये ठेकेदारांना अदा करण्यात आलेले आहेत. या योजनेत माजलगाव बॅक वॉटरमधून जलदगतीने आणि पूर्ण दाबाने पाणी मिळावे या करीता दिड ते दोन कोटी रूपयांचे पंप मोटारी खरेदी करण्यात आल्या. पण विद्यूत भार मिळत नसल्याचेकारण सांगत ह्या मोटारी बसविल्या नाहीत. मागील तीन ते चार वर्षापासून या मोटारी त्या ठिकाणी धूळ खात पडून आहेत याचे कोणालाही, कसलेही देणे घेणे नाही. फक्त खापर फोडायचे ते महावितरणच्या माथी.... योजना पूर्ण क्षमतेने सुरू व्हावी, विद्युत भार मिळावे म्हणुन शासनाने यासाठी ▶▶ पान २ वर

### बेजबाबदार कार्यकारी अभियंता, उपअभियंता आणि शाखा अभियंता यांची विभागीय चौकशी करावी?

बीडकरांना, चांगले आणि स्वच्छ पाणी मिळावे आणि बीडकरांचे आरोग्य चांगले रहावे या करीता केंद्र आणि राज्य शासनाने बीड शहराला अमृत पाणी पुरवठा योजना आणि भुयारी गटार योजना मंजूर केली. पण या बेजबाबदार आणि बेशिस्त अधिकाऱ्यांमुळे या दोन्ही योजनाचा बट्टयाबोळ झाला असून या दोन्ही कामात मोठ्या प्रमाणात बोगसगिरी आणि गैर कामे करण्यात आलेली असून या सर्व कामांची एसआयटी गठीत करून या बेजबाबदार कार्यकारी अभियंता, उपअभियंता आणि शाखा अभियंता यांची सखोल चौकशी करावी.

### १७.५० कोटी रूपये खर्च झाले, योजना बंद झाली जबाबदार कोण?

बीड शहरातील नागरीकांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने १६५ कोटी रूपयांची आर्थिक तरतुद केली. या योजनेतून मलशुध्दीकरण केंद्र, वेट वॉल सह बीड शहरात भुयारी गटार करायची होती. नगर पालिकेने या वेट वॉलसाठी जागाच दिली नाही. नगर पालिकेकडे तशी जागा ही नाही. फक्त आणि फक्त शासनाकडून निधी मंजूर घेण्यापुरता त्यांनी काही खाजगी व्यक्तींकडून करारनामा करत शासनाची दिशाभुल केली आणि योजना मंजूर करून घेतली. जागा उपलब्ध नसल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने हे काम बंद करून टाकले. या कामांवर जीवन प्राधिकरणाने १७.५० कोटी रूपये ठेकेदाराला अदा केले. ठेकेदाराने ही रक्कम घेवून बीडमधून तोबारा केला. योजनाही बंद झाली, १७.५० कोटी गटारीत गेले याला आता जबाबदार कोण? याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

### उद्या कॅबिनेट बैठक उरकून येणार बीडला, आढावा बैठक घेणार

# अजित पवार मुक्कामी, पालिकेच्या आकड्यांची करणार जुळवाजुळव



### ३१ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील अनेक विकास कामांचा शुभारंभ

बीड, (दिव्य न्युज):- बीड नगरपालिकेत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा नगराध्यक्ष व १९ नगरसेवक निवडून आल्यानंतर आता उपनगराध्यक्षपद आणि विषय समित्यांच्या सभापतिपदासाठी बहुमत नसल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून आकड्यांची जुळवाजुळव सुरू करण्यात येत आहे. ३० डिसेंबर रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे बीडला मुक्कामी येत आहेत. या मुक्कामात ते आकडयांचे गणित जुळवणार आहेत ३२ डिसेंबर रोजी विविध विकासकामांचा शुभारंभ, आढावा बैठका घेणार आहेत. उपनगराध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती यांच्या निवडीसाठी पुरसे संख्याबळ राष्ट्रवादीकडे नाही. याचा फायदा घेत क्षीरसागर बंधू एकत्र येऊन बीड क्षीरसागरमुक्त होऊ देणार नाही, या मुद्दयावर पराभवाचे उट्टे काढू शकतात, असा राजकीय जाणकारांचा अंदाज आहे. बीडचे पुढचे सत्तासमीकरण हे आकड्यांच्या खेळात अडकले आहे. ▶▶ पान २ वर

# बीड नगर पालिकेत तुतारीकडून खुर्शीद आलम गटनेते होणार?

बीड,(दिव्य न्युज):- नुकत्याच झालेल्या नगर पालिका निवडणुकीमध्ये शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसला नगराध्यक्ष पदाच्या लढतीत तिसऱ्या क्रमांकावर रहावे लागले, असे असले तरी तुतारी चिन्हावर या पक्षाचे १२ नगर सेवक विजयी झालेले आहेत. विजयी झालेल्या नगर सेवकांची यादी आणि त्यांचा अनुभव लक्षात घेता या १२ नगर सेवकांमध्ये अनुभवी नगर सेवक म्हणून खुर्शीद आलम हे आहेत. यामुळे त्यांचे नाव तुतारीकडून गटनेते म्हणून



निश्चित मानले जातआहे. या निवडीमध्ये बीडचे आ. संदीप क्षीरसागर आणि त्यांचे निकटवर्ती माजी आ. सय्यद सलिम यांची भूमिका महत्वाची राहणार आहे. आता हे नेते काय निर्णय घेतात ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बीड बसस्थानकात घाणीचे साम्राज्य लहान थोरांच्या आरोग्यास धोका

### प्रवाशांच्या प्रतिक्षागृहात पान-गुटख्याची पिचकारी

बीड, (दिव्य न्युज):- महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दौऱ्यासाठी नगर रोडवरील रस्त्याच्या कडा पाण्याने धुऊन काढणाऱ्या बीड नगरपालिकेचा 'स्वच्छता' फंडा उघड झाला आहे. शहराची स्वच्छता केवळ व्हीआयपी दौऱ्यापुरती मर्यादित असल्याचे चित्र दिसत असून, सामान्य नागरिकांच्या दररोजच्या वापरातील बीड बसस्थानक ▶▶ पान २ वर



## गलेगट्ठ पगार तरी क्लासवन अधिकाऱ्यांनाही पाहिजे लाच

# बीडमध्ये दोन वर्षात ९ क्लासवन अधिकारी लाच घेतांना एसीबीच्या जाळ्यात

**बीड, (दिव्य न्युज):- लाच ही फक्त शिपाई, लिपिक किंवा कनिष्ठ कर्मचाऱ्यांपुरती मर्यादित आहे हा समज बीड जिल्ह्यातील वास्तवाने खोटा ठरवला आहे. लाखोंच्या घरात पगार घेणारे, उच्च पदांवर कार्यरत असलेले क्लासवन अधिकारीही भ्रष्टाचारात तितकेच बुडालेले असल्याचे दिसत आहे. गेल्या दोन वर्षांत बीड जिल्ह्यात तब्बल ९ क्लासवन अधिकाऱ्यांना लाचखोरीच्या प्रकरणात कारवाईला सामोरे जावे लागले आहे.**



बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होण्याला संबंधित विभागांचे अधिकारीही तेवढेच जबाबदार असल्याचे स्पष्ट होत आहे. कारण वरिष्ठ अधिकाऱ्यांचा थेट सहभाग किंवा मौनसंमती असल्याशिवाय एवढ्या प्रमाणात भ्रष्टाचार फोफावणे शक्य नसते. अनेक प्रकरणांमध्ये कामे मंजूर करणे, फाईल पुढे सरकवणे, परवाने, अनुदान, बिल पास करणे, बदली, चौकशी थांबवणे अशा कारणांसाठी थेट मोठ्या रकमेची मागणी केली जाते. अनेकदा अधिकच्या लालसेपोटी मागितली जाणारी रक्कम सर्वसामान्य नागरिकांना देणे शक्य होत नाही. अशावेळी त्रस्त नागरिक थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल करतात. यापूर्वी शिपाई, लिपिक, कर्मचारी अशा कनिष्ठ पदावरील अनेक जण एसीबीच्या जाळ्यात अडकलेले दिसले. मात्र मुख्य खुर्चीवर बसलेले 'साहेब' अनेकदा कायद्याच्या कचाट्यातून निसटत होते. तरीदेखील बीडमध्ये एसीबीने धाडसी कारवाया करत वरिष्ठ स्तरावरही – हात घातला असून, क्लासवन अधिकाऱ्यांवरील कारवाईमुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. एसीबीच्या या कारवायांमुळे कायद्यापुढे कोणीही मोठा नाही हा संदेश स्पष्टपणे गेला आहे. वरिष्ठ अधिकारी लाच मागत असतील, तर त्यांच्याविरोधातही कारवाई होऊ शकते, हेच एसीबीने दाखवून दिले आहे.

### वर्षभरात ३३ लाचखोर पकडले

२०२५ या वर्षात वेगवेगळ्या विभागात लाचखोरीचे २३ गुन्हे दाखल झाले असून ३३ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये महावितरण ०२, जिल्हा परिषद ०१ आणि नगरपरिषदेतील ०१ अशा ०४ क्लासवन अधिकाऱ्यांचा समावेश आहे. तर सर्वाधिक लाचखोर हे जिल्हा परिषद, पंचायत समिती व दुसऱ्या क्रमांकावर महावितरण विभाग आहे.

### लाचेची मागणी केल्यास त्वरीत एसीबीला संपर्क करण्याचे आवाहन

कुठलाही लोकसेवक लाचेची मागणी करत असल्यास भीती न बाळगता त्वरित एसीबीशी संपर्क साधावा. तक्रारदारांची ओळख गोपनीय ठेवली जाते आणि कायद्याच्या चौकटीत सुरक्षित कारवाई केली जाते. भ्रष्टाचारमुक्त प्रशासनासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, लाच देणे आणि घेणे दोन्हीही गुन्हा आहेत, याची जाणीव ठेवून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन बीड एसीबीचे उपअधीक्षक सोपान चिट्टमपले यांनी केले आहे

पान ४ वरून

## नगर पालिकेच्या

नगर सेवक विकास कामांच्या बाबतीत नेहमीच पुढे राहतील. राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि आ. विजयसिंह पंडित यांनीही बीडकरांना विकास कामांचा शब्द दिलेला आहे. गेल्या ३५ वर्षात झाला नाही असा विकास अजितदादांच्या माध्यमातून आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनात होईल असा विश्वास शेख मुजीब यांनी व्यक्त केला.

नागरिकांनी स्वतः देखील कामावर लक्ष द्यावे

बीड शहरातील ज्या प्रभागात काम सुरु असेल त्या भागातील नागरिकांनी, जबाबदार व्यक्तिंनी जागरुक राहून मोजपट्टीने काम मोजून गुत्तेदाराकडून करून घ्यावे. काही कमी जास्त असेल तर तात्काळ नगर पालिका पदाधिकारी आणि प्रशासनाच्या ते निदर्शनास आणून द्यावे, जे काम होत आहे ते नागरिकांनीच स्वतः क्वॉलिटीचे करुन घ्यावे असे आवाहन शेख मुजीबभाई यांनी यावेळी केले.

## आ.सुरेश धस यांच्य

लागत होता.या पार्श्वभूमीवर रस्ते परिवहन व राजमार्ग मंत्रालयाच्या तांत्रिक सल्लागारांनी संबंधित प्रादेशिक अधिकारी व मुख्य अभियंत्यांना भूसंपादन कायदा व मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे केंद्र सरकारकडून ठोस हालचाली सुरू झाल्या असून, या निर्णयामुळे पाटोदा, आष्टी, शिरूर (कासार) व परिसरातील नागरिक, शेतकरी आणि वाहनचालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. लवकरच उर्वरित महामार्ग कामे पूर्ण होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे

## माता नर्मदा परिक्रमा पूर्ण

सिरस, सोनगाव, दिमाखवाडी-साक्षाळ पिंप्री, पौंडुळ फाटा मार्गे श्री क्षेत्र नारायणगड येथे समारोप होणार आहे.

माता नर्मदा परिक्रमा पूर्ण केल्याबद्दल गुरुवर्य महंत शिवाजी महाराज यांच्या दर्शनासाठी व स्वागतासाठी परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून श्री क्षेत्र नारायणगड सर्व भक्तगणांच्या वतीने भाविकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या भव्य स्वागत रॅलीत सहभागी होऊन गुरुवर्य महंत शिवाजी महाराजांचे दर्शन व आशीर्वाद घेण्याची संधी साधावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## अपघातांना आमंत्रण

त्यानुसार दरवर्षी पालिकांकडून शपथपत्र दाखल करण्यात येते. मात्र प्रत्यक्षात बीडमध्ये बॅनरमुक्ती केवळ कागदोपत्रीच असून हे थेट न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन आहे. ही बाब गंभीर असून याला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी जबाबदार असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

नाशिक शहरात अनधिकृत बॅनर व होर्डिंग्ज लावणाऱ्यांवर थेट बॅनरवर झळकलेल्या व्यक्तींविरोधात एफआयआर दाखल करत २१ पेक्षा अधिक गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. राज्यभर चर्चेचा विषय ठरलेला आणि कौतुकास्पद असा 'होर्डिंग्जमुक्तीचा नाशिक पॅटर्न' बीडमध्येही तातडीने राबवावा, अशी ठाम मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली.बीड नगरपरिषद निवडणुकीत जनतेने मोठ्या अपेक्षेने निवडून दिलेल्या नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींनी पदभार स्वीकारण्यापूर्वीच कायदे व नियम पायदळी तुडवल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. सर्वपक्षीय विजयी उमेदवारांनी सत्तेची धुंदी चढताच शहरभर अनधिकृत बॅनरबाजीचा कहर केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## ठाकरे बंधूंची एकी,

लोकसभा, विधानसभेच्या निवडणुका झाल्या, शिवसेना-राष्ट्रवादी यांच्या चिन्हांचा तिढा, ठाकरे बंधूंची एकी, नवे प्रदेशाध्यक्ष, नेत्यांचे वादग्रस्त आणि तथ्यहिन वक्तव्य अशा अनेक कारणांमुळे २०२५ चांगलेच गाजले. त्याचा हा धावता आढावा

०५ जुलै ते २४ डिसेंबर २०२५. महाराष्ट्राच्या राजकारणात मैलाचा दगड म्हणता येईल, अशी घडामोड यंदा घडली. दोन दशके दूर असणारे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यातील कौटुंबिक मनोमिलन आणि राजकीय एकी ही या वर्षाची कमाई म्हणता येईल. इयत्ता पहिलीपासून हिंदीची सक्ती करणारा निर्णय सरकारने मागे घेतल्यानंतर उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरेंच्या मनसेकडून ५ जुलै रोजी विजयी मेळावा आयोजित करण्यात आला होता. वरळी डोममधील मेळाव्यात उद्धव आणि राज या ठाकरे बंधूंनी हातात हात घेतला आणि तिथूनच पुन्हा कौटुंबिक जिव्हाळा आणि राजकीय युतीची पाऊले पडायला सुरुवात झाली. याच मेळाव्यात उद्धव ठाकरेंनी 'एकत्र आलो ते एकत्र राहाण्यासाठी' असे मोठे वक्तव्य केले होते. त्यानंतर २४ डिसेंबर रोजी दोघांच्या शिवसेना आणि मनसे या राजकीय पक्षांच्या युतीची जाहीर घोषणा झाली.३० जून २०२५. महाराष्ट्र सरकारने १६ एप्रिल रोजी राज्यात त्रिभाषा सूत्राचा अध्यादेश काढला. पहिलीपासून हिंदीच्या सक्तीला मराठी भाषकांनी कडाडून विरोध केला. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३ नुसार, त्रिभाषा सूत्राचा अवलंब करून महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याचा शासनादेश काढण्यात आला होता. देवेंद्र फडणवीस यांच्या महायुती सरकारच्या या निर्णयाला मराठी अभ्यास केंद्रासह राज आणि उद्धव ठाकरे या ठाकरे बंधूंसह विरोधी पक्षांनी जोरदार विरोध केला होता. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी १६ एप्रिलचा जीआर आणि १७ जून रोजीचा सुधारित जीआर रद्द करुन ३० जून नवा आदेश जारी करत राज्यातील त्रिभाषा सूत्राचा शासनादेश मागे घेतला.

९ जुलै २०२५. पावसाळी अधिवेशन सुरु असताना शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी मुंबईतील आमदार निवासातील कँटीनमधील कर्मचाऱ्याला अन्नाची दुर्गंधी आल्याचा दावा करत मारहाण केली. आमदार गायकवाड यांनी बनियान आणि टॉवेलवरच कँटीनमध्ये येऊन कर्मचार्याला बॉक्सिंग स्टाइल पंच लगावले. त्यांची ही बॉक्सिंगगिरी चांगलीच गाजली. जनतेच्या प्रश्नांवर एवढे आक्रमक केव्हा व्हाल, अशी टीका त्यांच्यावर झाली होती.१७ जुलै २०२५. महाराष्ट्रातील राजकारण किती खालच्या पातळीवर गेले आहे, हे या दिवशी दिसले. महाराष्ट्राच्या विधिमंडळ परिसरात पहिल्यांदाच हाणामारीची घटना घडली. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात भाजप आमदार गोपीचंद पडळकरांचा कार्यकर्ता ऋषिकेश टकले आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार जितेंद्र आव्हाड यांचा कार्यकर्ता नितीन देशमुख यांच्यामध्ये विधिमंडळाच्या लॉबीमध्ये जोरदार हाणामारी झाली. अखेर दोष कोण याचा निवाडा करण्यासाठी समिती स्थापन करावी लागली.

पान १ वरून

## बीडची अमृतपाणी

सहा ते आठ कोटी रूपये मंजूर करून सौर ऊर्जा प्रकल्प मंजूर केले पण या जिवन प्राधिकरणारने दोन ठिकाणी असलेले हे काम पूर्ण न करता ठेकेदाराला (कंपनी) ला रक्कम अदा करून टाकली. याला जबाबदार कोण?

अशीच काहीशी स्थिती भुयारी गटार योजनेची असून याही साठी शासनाने तब्बल १७.६० कोटींचा निधी मंजूर केला पण हे ही काम मागील सात ते आठ वर्षात पूर्ण झाले नाही. तब्बल १७ कोटी रूपये यातून खर्च करून ठेकेदारांनी स्वतःचे भले करून घेत ही योजना शासनाच्या आदेशाने बंद केल्याचे सांगण्यात आले. पण तसे पत्र ते आजपर्यंत देवू शकलेले नाहीत. शासनाचे पत्र आमच्याकडे आहे म्हणूनच ही योजना आम्ही बंद करत आहोत, त्याचे कारण देतांना ते सांगतात की नगर पालिकेने आम्हाला पंपींगसाठी जागाच दिली नाही म्हणुन हे काम बंद करण्यात येत आहे.... असे बेजबाबदार आणि चुकीचे कामे करणारे कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची या ठिकाणावरून तात्काळ उचलबांगडी करण्यात यावी आणि या प्राधिकरणाला कायम स्वरूपी पुर्व वेळ काम करणारा कार्यकारी अभियता देण्यात यावा आणि उपअभियंता आणि शाखा अभियंताही देण्यात यावा जेणेकरून ही बंद पडलेली दोन्ही कामे मार्गी लागतील.

## अजित पवार मुक्कामी,

चौकट

सकाळी साडेसहा वाजता करणार भवनाचे भूमिपूजन

उपमुख्यमंत्री अजित पवार हे ३१ डिसेंबर रोजी सकाळी साडेसहा वाजताच सहकार भवनाचे भूमिपूजन करणार आहेत. बीडकर झोपेत असतानाच पवारांच्या कामाचा धडाका सुरू होईल, नंतर बीड जि.प.च्या काही कामांचे भूमिपूजन होईल, जिल्हाधिकारी कार्यालयात काही सादरीकरण, इमारतींची पाहणी, बैठका होणार आहेत.

तर आ. संदीप क्षीरसागर विकासाच्च्या मुद्द्यावर सोबत

दोन्ही क्षीरसागर बंधू एकत्र येऊन राष्ट्रवादीला धक्का देतील. राज्यात ठाकरे। बंधू एकत्र येतात तर बीडमध्ये क्षीरसागर बंधू का नको अशी चर्चा होत आहे. मात्र, बीड शहराच्या विकासाच्या मुद्यावर आ. संदीप क्षीरसागर हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला पाठिंबा देऊ शकतात. यामुळे पुण्याप्रमाणे बीडमध्ये निवडणुकीपश्चात समीकरणासाठी २ राष्ट्रवादी एकत्र येतील, अशी शक्यताही आहे

आगामी निवडणुकांचाही केला जाणार विचार

बीड पालिकेतील सत्ताङ्गङ्गसमीकरणाचे आकडे जुळवताना आता आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांचाही विचार केला जात आहे. दोन्ही भाऊ एकत्र आले तर दोघे एकच आहेत, असा विरोधक प्रचार करतील, त्यामुळे ग्रामीणच्या निवडणुकांत दोघांचीही अडचण होईल. असाच प्रकार दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित आल्या तर होऊ शकतो. त्यामुळे एकत्रित येऊन सत्तेत सहभागी व्हायचे की, गैरहजर राहून मदत को राम्रा यी हेही महत्त्वाचे ठरणार आहे,

स्वीकृत सदस्यांबाबतही चर्चा : पवार हे राष्ट्रवादीच्या कोटधातून स्वीकृत

सदस्य कुणाला घ्यायचे याचाबतही चर्चा करणार आहे. शिवसंग्रामच्या ज्योती मेटे यांनी २ दिवसांपूर्वी पवारांची भेट घेतली होती. स्वीकृत सदस्यांत शिवसंग्रामलाही वाटा मिळणार आहे. शिवसेना या युतीतील घटक पक्षालाही किती जागा द्यायच्या याबाबत निर्णय होणार आहे. राष्ट्रवादीमधूनही कोणाची नावे अंतिम करायची याबाबत उपमुख्यमंत्री पवार मार्गदर्शन करतील.

## बीड बसस्थानकात

मात्र घाणीच्या आणि अराजकतेच्या गर्तेत सापडले आहे.

प्रतिक्षागृहाची दुरवस्था: बसस्थानकातील प्रवाशांच्या बसण्याच्या जागेमागे (प्रतिक्षागृहाच्या भिंतीवर) पान, गुटखा आणि तंबाखू खाऊन थुंकल्यामुळे सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. नागरिकांच्या तक्रारीनुसार, नगरपालिका या ठिकाणी नियमित स्वच्छता करत नसल्यामुळे हे चित्र उघड झाले आहे. 'स्वच्छता अभियान' केवळ कागदावरच असल्याचे बीड बसस्थानकाची स्थिती पाहून स्पष्ट होते.

'दादां'साठी स्वच्छता, नागरिकांसाठी दुर्लक्ष: मिळालेल्या माहितीनुसार, ३१ डिसेंबर रोजी अजित पवार बीडमध्ये येणार असल्याने केवळ नगर रोडच्या कडा पाण्याने धुऊन काढण्यात आल्या. याचाच अर्थ, बीड शहराची स्वच्छता केवळ उच्चपदस्थ नेत्यांच्या दौऱ्यासाठीच केली जाते. सामान्य नागरिकांच्या आरोग्याचा आणि स्वच्छतेचा प्रश्न प्रशासनाच्या प्राधान्यक्रमात नसल्याचे यावरून दिसून येते.

दारुड्यांचा बसस्थानकात सुळसुळाट: बसस्थानकामध्ये सायंकाळनंतर आणि रात्रीच्या वेळी दारू पिणाऱ्यांचा आणि असामाजिक तत्त्वांचा सुळसुळाट वाढला आहे. हे लोक सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन गोंधळ घालतात, नशेत बसण्याच्या आसनावरच झोपतात आणि प्रवाशांना अश्लील शिवीगाळ करतात.

पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह: बसस्थानकासारख्या महत्त्वाच्या ठिकाणी खुलेआम गैरकृत्ये आणि गोंधळ सुरू असतानाही, पोलीस प्रशासन या गंभीर प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि सार्वजनिक शांततेसाठी तैनात असलेल्या पोलिसांनी केवळ बघ्याची भूमिका घेतल्याने हे असामाजिक तत्त्व निर्ढावले आहेत. यामुळे प्रवाशांमध्ये विशेषतः महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे.मागणी: सामान्य नागरिकांची मागणी आहे की, नगरपालिकेने व्हीआयपी दौऱ्यांप्रमाणेच बसस्थानकाची नियमित आणि प्रभावी स्वच्छता करावी. तसेच, पोलिसांनी बसस्थानकात दारू पिऊन गोंधळ घालणाऱ्यांवर आणि अश्लील वर्तन करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, जेणेकरून प्रवाशांना सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण मिळेल.

# भाजप जिल्हाध्यक्षांसमोरच कार्यकर्ते-नेत्यांची हमरीतुमरी

## नगरपालिकेतील दारूण पराभवाचे उमटले पडसाद




माजलगाव, (दिव्य न्युज):- भाजपचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या माजलगाव शहरात नगरपालिकेच्या निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवाचे पडसाद आता उमटू लागले आहेत. शनिवारी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती प्रसंगी भाजपमधील अंतर्गत कलह उघडपणे समोर आला. जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत पराभूत उमेदवार आणि पक्षाचे पदाधिकाऱ्यांमध्ये जोरदार 'हमरीतुमरी' झाल्याने शहरात या वादाची मोठी चर्चा रंगली आहे.

नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत भाजपला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले होते. हा पराभव केवळ राजकीय नसून पक्षातीलच काही नेत्यांनी केलेल्या 'पक्षविरोधी' कामाचा परिणाम असल्याचे आरोप यावेळी करण्यात आले. काही नेत्यांनी गट) राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार मत्री पंकजा मुंडे यांचे मन वळवले, मात्र प्रत्यक्षात निवडणुकीत पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात काम करून त्यांना पाडल्याचा गंभीर आरोप पराभूत उमेदवारांनी यावेळी केला.

गटबाजीमुळे भविष्यातील निवडणुकांवर सावट

नगरपालिकेत अनुकूल परिस्थिती असतानाही पक्षांतर्गत गटबाजीमुळे भाजपला फटका बसला आहे. हीच गटबाजी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतही पक्षाला बाधणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. जिल्हाध्यक्षांसमोर झालेला हा वाद मिटविण्यात पक्षाला यश येते की नाराजी उफाळून येते, याकडे लक्ष आहे.

जिल्हाध्यक्षांसमोरच उडाला गोंधळ

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी इच्छुक होत्या. बैठकीत डॉ. प्रकाश उमेदवारांच्या मुलाखती शनिवारी सुरू आनंदगावकर बोलण्यासाठी उभे राहिले असतां, एका पराभूत उमेदवाराने, त्यांच्याकडे बोट दाखवून, तुमच्यामुळेच आमचा पराभव झाला, असे म्हणत ओरड सुरू केली. यावरून बैठकीत प्रचंड गोंधळ निर्माण झाला. इतर पडलेल्या उमेदवारांनीही या सुरात सूर सूर मिसळत जिल्हाध्यक्षांसमोरच नेत्यांच्या विरोधात आपला संताप व्यक्त केला. बैठकीला माजलगावचे निवडणूक प्रभारी योगेश क्षीरसागर हेदेखील उपस्थित होते.

मुंडे भगिनीं वर कार्यकर्ते नाराज

माजलगाव तालुक्याची जबाबदारी माजी खासदार प्रीतम मुंडे यांच्याकडे सोपवण्यात आली असल्याचे पंकजा मुंडे यांनी जाहीर केले होते. मात्र, संपूर्ण नगरपालिका निवडणुकीच्या काळात प्रीतम मुंडे एकदाही माजलगावकडे फिरकल्या नाहीत. स्वतः पंकजा मुंडे यांनी केवळ एकच सभा घेतली आणि त्यानंतर लक्ष दिले नाही. नेत्यांच्या या दुर्लक्षामुळे आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या विरोधात काम करण्याच्या पद्धतीमुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये मुंडे भगिनींविषयी नाराजीचा सूर पाहायला मिळत आहे.

## निवडून येताच प्रभागात सुरू केले काम

# जैतुल्ला खान यांची हॅट्रीक

## प्रभाग क्रं.६ मधून सलग तिसऱ्यांदा विजयी, सोबतीला मोमीन जकी सारखा अभ्यासू जोडीदार



बीड, (दिव्य न्युज):- जुना बाजार प्रभाग क्रमांक ६ ब मधून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार जैतुल्लाह खान हे सलग तिसऱ्यांदा विजयी झाले असून जैतुल्लाह खान यांची हॅट्रीक आहे. विशेष म्हणजे त्यांची ही निवड बहुमताने झाल्याने त्यांनी केलेल्या निःस्वार्थ सेवेचे फळ नागरिकांनी मतदान रूपात दिले असल्याचे स्पष्ट दिसून आले. झाल्याची चर्चा प्रभागात रंगली रपालिकेवर प्रशासकारासह कोणीही नगरसेवक नव्हते, परिस्थितीत अनेक प्रभाग उघड्यावर पडलेले होते. परंतु प्रभाग क्र.६ मधून निवडूण आलेले जैतुल्लाह खान हे मात्र आपल्या प्रभागासाठी झटत असल्याचे दिसून आले. तसेच जिल्हा रुग्णालय असो की, इतर कुठेही गरजूंना गरज असेल तर त्यांच्या मदतीला जैतुल्लाह खान नेहमी तत्पर असतात. विशेष म्हणजे कधीही कोणाची जात न पाहता गरजेनुसार त्यांना मदत करणे हेच त्यांचा धर्म समजून ते आपले कर्तव्य पार पाडतात. यंदा त्यांच्या प्रभागात काटे की टक्कर अशी अवस्था होती. कोण निवडूण येणार हे गुपित मतदारांच्या मनात जैतुल्लाह खान यांना भरभरून साथ देत त्यांना नगरसेवक म्हणून निवडूण दिले. विशेष म्हणजे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नगराध्यक्ष निवडूण आल्याने याचा प्रभागाला मोठा लाभ मिळणार हे मात्र खरे आहे.

अशा कर्तबगार नगरसेवकावर मोठी जबाबदारी देणे गरजेचे

जैतुल्लाह खान सतत तिसऱ्यांदा निवडणूक लढवून विजयी झाले आहेत. यापूर्वीही त्यांच्याकडे सभापती पदाची जबाबदारी होती. यंदाही त्यांच्यावर नगराध्यक्ष यांनी मोठी जबाबदारी सोपवावी अशी सर्व स्तरातून मागणी होत असून जैतुल्लाह खान यांच्यासारख्या कर्मयोगी व्यक्तीला शोभणारे पद नगराध्यक्ष देतील अशी प्रतिक्रिया प्रभागातील नागरिकांनी व्यक्त केली.





# दिंद्रुच्या जिल्हा परिषद शाळेमध्ये डॉक्टर निकिता

## संजय सपाटे यांचा सत्कार संपन्न

### जिल्हा परिषद शाळेत शिकूनच मी आज एम डी करते – डॉ. निकीता सपाटे



वडवणी (दिव्य न्युज):- माझे शिक्षण कुठल्याही इंग्रजी शाळेत झालेले नाही. इंग्लिश स्कूल मध्ये शिकूनच विद्यार्थी घडतात असा लोकांचा गैरसमज असून, जिल्हा परिषद शाळेत शिकूनच आज मी बेंगलोर (कर्नाटक) मध्ये एम डी करत असल्याचे मत डॉ.निकीता सपाटे यांनी व्यक्त केले. संविधान दिनाचे औचित्य साधत काल आयोजित कार्यक्रमात सत्काराला उत्तर देताना त्या बोलत होत्या. दिंद्रुड येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक (कन्या-मुलांची) शाळेत संविधान दिन साजरा करण्यात आला.

भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संविधानाची उद्देशिका यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष दादासाहेब वक्रे तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विभागाच्या जेष्ठ विस्तार अधिकारी प्रणिता कापसे होत्या. ज्येष्ठ पत्रकार बंडूजी खांडेकर, संतोष स्वामी, बाबासाहेब देशमाने, सामाजिक कार्यकर्त्या संजीवनी राऊत, संजय सपाटे, उद्धव केकाण, राम देशमाने आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शाळेची माजी विद्यार्थीनी डॉ. निकीता संजय सपाटे हिचा शाळेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. पुढे बोलताना डॉ. निकीता म्हणाल्या की, जिल्हा परिषद शाळेत सोई सुविधांचा अभाव असला तरी आपली जिद्द आणि गुणवत्तापूर्ण शिक्षकांमुळेच या शाळेतून खरे हिरे बाहेर पडतात. याच जिल्हा परिषद शाळेने अनेक डॉक्टर, पोलीस, शिक्षक असे विविध क्षेत्रातील पदाधिकारी घडवले आहेत, आमच्या वडिलांनी खूप कष्टातुन शिकवले असेहि त्या म्हणाल्या. प्रणिता कापसे, संतोष स्वामी सह आदिंनी आपले मनोगत व्यक्त केले तर दादासाहेब वक्रे यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक सिद्धेश्वर बोकन सूत्रसंचलन मनोहर कटारे तर आभार हभप हरिदास सोळंके यांनी व्यक्त केले. यावेळी पालकांसह सर्व शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते.

# माजलगाव शहरातील जुन्या बसस्थानक जागेतील ठक्कर बाजार बांधकाम करुन व्यापारी यांना करारनामा करुन विक्री करण्यात आले त्यांची सखोल चौकशी करुन गुन्हे दाखल करा-मुस्ताक कुरेशी

## उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयसमोर अन्न पाणी बंद करून आमरण उपोषण करणार

माजलगाव ,(दिव्य न्युज):- माजलगाव शहरातील सर्व नं.३७५/१ मौजा माजलगांव शहरातील सार्वजनिक जागा नगरपरिषद कार्यालय कडून करारनामा करुन जुना बसस्थानक ची याठिकाणी चालू करण्यात आले परंतु जुना बसस्थानक चालू असताना यांनी तो बंद करून त्याठिकाणी व्यापारी यांना ठक्कर बाजार कॉम्प्लेक्स बांधकाम करुन विक्री करण्यात आली आहे. आज त्याठिकाणी प्रवासाना भर चौकात उन्हांत पावसात भर रस्त्यावर वृद्ध महिला व विद्यार्थ्यांना एसटी वाट बघत उभा रहावे लागत आहे याची चौकशी करून योग्य कारवाई करण्यात यावी.

माजलगांव शहरातील जुन्या बसस्थानक जागेची मोजमाप करुन कंपाऊंड भितीचे बांधकाम करुन त्याठिकाणी प्रवासाना सेवा साठी तात्काळ बसस्थानक चालू करण्यात यावे . जुन्या बसस्थानक जागेत ठक्कर बाजार कॉम्प्लेक्स करण्यात आले त्यांची चौकशी करुन अवैध बांधकाम जमीनदस्त करुन त्याठिकाणी शासनाने ताब्यात घेऊन तात्काळ त्याठिकाणी योग्य कारवाई करण्यात यावी.

नगरपरिषद कार्यालय कडून सार्वजनिक जागा ३४ गुंटे आरक्षित घोषित करण्यात परंतु ती जागा बस बसस्थानक करण्यासाठी घेण्यात आली आणि त्याठिकाणी ठक्कर बाजार व्यापारी संकुलन कॉम्प्लेक्स बांधकाम करुन विक्री करण्यात आली त्यांची संपूर्ण सखोल चौकशी करुन पाडण्यात यावे व जुन्या बसस्थानक जागेची मोजमाप करुन कंपाऊंड करण्यात यावे . माजलगांव नगरपरिषद कार्यालय कडे ३४ गुंटे जमीन सार्वजनिकसाठी आरक्षित जागा ठेवण्यात आली परंतु प्रवासच्या सेवा साठी एसटी महामंडळ यांनी नगरपरिषद कार्यालय कडुन घेतली त्याठिकाणी चांगले एसटी बसस्थानक निर्माण झाले नंतर त्याठिकाणी व्यापारी यांना विक्री करण्यात आली कोणच्या फायदे साठी यांची सखोल चौकशी करण्यात यावी.






माजलगाव नगरपरिषद कार्यालय कडुन बांधकाम परवानगी घेतली असेल तर ती रद्द करुण बांधकाम परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करण्यात यावी कारण सार्वजनिक जागेत एस टी महामंडळ यांनी प्रवास याना एस टी महामंडळ यांनी बसस्थान उभारणीसाठी ताब्यात घेतली परंतु व्यापारी संकुलन कॉम्प्लेक्स बांधकाम परवानगी का देण्यात आली यांची सखोल चौकशी करुन योग्य कारवाई करण्यात यावी,माजलगांव शहरातील नगरपरिषद कार्यालय कडुन जुन्या बसस्थानक साठी जागा घेण्यात आली होती परंतु त्याठिकाणी ठक्कर बाजार संकुल कॉम्प्लेक्स बांधकाम करण्यात आले आज प्रवासाना भर चौकात एसटी बस वाट बघत उभा रहावे लागत आहे आणि जुन्या बसस्थानक जागेत ठक्कर बाजार बांधकाम करण्यात आले त्यांची संपूर्ण सखोल चौकशी करुन ठक्कर बाजार पाडण्यात यावे.

तसेच जुन्या बसस्थानक जागेची मोजमाप होत नाही व सर्व जागे वरील अतिक्रमण काढण्यात येत नाही तो पर्यत त्याठिकाणी कंपाऊंड बांधकाम करु नये कारण आज त्या जागेवर बसस्थानक झाले असते तर आज प्रवासाना भर चौकात एसटी बस वाट बघत उभा रहावे लागत नसते तसेच भर चौकात जागा असून ही त्या जागेचा फायद्यासाठी त्याठिकाणी ठक्कर बाजार कॉम्प्लेक्स बांधकाम करण्यात आले त्यांची संपूर्ण सखोल चौकशी करुन योग्य कारवाई करण्यात यावी, नसता लोकशाही मार्गाने अन्न पाणी बंद करुन आमरण उपोषण दि,१९/०१/२०२६ रोजी उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालय समोर करण्यात येईल अशी मागणी महाराष्ट्र मुस्लिम युवक जिल्हाध्यक्ष यांनी केली आहे

# नगर पालिकेच्या कामात टक्केवारी चालणार नाही-संपादक शेख मुजीब



**बीड,(दिव्य न्युज) :- बीड शहरातील नागरिकांनी अतिशय चांगले लोकप्रतिनिधी निवडून दिले आहेत. विकास कामे करण्यासाठी या सर्व लोकप्रतिनिधींच्या संकल्पना आणि अनुभव कामी येणार आहेत. नगर पालिकेच्या कामात टक्केवारी अजिबात चालणार नाही, आम्ही एक रुपया खाणार नाहीत आणि एक रुपयाची टक्केवारी कोणाला देणार सुद्धा नाही, असे म्हणत नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीबभाई यांनी स्पष्ट केले. नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी चार्ज घेण्या आधीच मुजीबभाईंनी ही भूमिका स्पष्ट करत बीड शहरात विकास कामांनाच प्राधान्य देण्यात येणार असल्याचे सांगितले.**

बीड शहरातील पिंपळे गल्ली येथे शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख बाळासाहेब पिंगळे यांनी रविवारी नगराध्यक्ष प्रतिनिधीसह नवनिर्वाचीत नगर सेवकांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी शेख मुजीबभाई बोलत होते. या प्रसंगी नवनिर्वाचीत नगर सेवक विनोद मुळूक, शुभम धुत, किशोर पिंगळे, शेख बिलाल यांच्यासह अन्य नगर सेवक उपस्थित होते. यावेळी मुजीबभाई म्हणाले, बीड नगर पालिकेच्या निवडणुकीत शहरवासियांनी अतिशय चांगले प्रतिनिधी निवडले आहेत. नगर सेवकांचा अनुभव आणि त्यांच्या संकल्पना शहरातील विकास कामांसाठी फायद्याच्या ठरतील. प्रत्येक प्रभागात विकास कामे करुत,

▶▶ पान २ वर

# आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नातून महामार्गासाठी अतिरिक्त भूसंपादन निधीचा मार्ग मोकळा

पाटोदा,(दिव्य न्युज):- पैठण-शिरूर (कासार)-खर्डा या एनएच-७५२ए राष्ट्रीय महामार्गाच्या रखडलेल्या कामांसाठी आमदार सुरेश धस यांनी ४ डिसेंबर रोजी केंद्रीय रस्ते परिवहन व राजमार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पत्राद्वारे केलेल्या मागणीची केंद्र सरकारने तातडीने दखल घेतली आहे. यामुळे महामार्गाच्या दोन्ही पॅकेजसाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त भूसंपादन निधीचा मार्ग मोकळा झाला आहे.

आमदार धस यांनी आपल्या पत्रात एनएच-७५२ए अंतर्गत पैठण-शिरूर (कासार) आणि शिरूर (कासार)-खर्डा या दोन्ही पॅकेजमधील भूसंपादनातील वाढीव खर्चाची वस्तुस्थिती केंद्राच्या निदर्शनास



आणून दिली होती. प्रत्यक्ष संयुक्त मोजणीनंतर भूसंपादन क्षेत्र व खर्चात मोठी वाढ झाल्यामुळे उर्वरित रस्ता कामे रखडल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.

दोन्ही पॅकेजमधील बहुतांश गावांचे भूसंपादन पुरस्कार जाहीर झाले असून सुमारे ८० टक्के रस्ता कामे पूर्ण झाली आहेत. मात्र अतिरिक्त निधीअभावी उर्वरित कामे थांबली असल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा

▶▶ पान २ वर

# माता नर्मदा परिक्रमा पूर्ण करून गुरुवर्य महंत शिवाजी महाराज यांचे नारायणगड येथे भव्य आगमन

बीड,(दिव्य न्युज):- माता नर्मदा परिक्रमा यशस्वीरीत्या पूर्ण करून श्री क्षेत्र नारायणगडचे मठाधिपती गुरुवर्य महंत शिवाजी महाराज यांचे मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी श्री क्षेत्र नारायणगड येथे भव्य आगमन होणार आहे.

या पावन प्रसंगी मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक ८ वाजता गेवराई येथे बाबांचे भक्तिभावाने स्वागत करण्यात येणार असून त्यानंतर श्री क्षेत्र नारायणगडपर्यंत भव्य स्वागत रॅलीद्वारे मार्गक्रमण करण्यात येणार आहे.



ही स्वागत रॅली गेवराई येथून प्रारंभ होऊन गढी पाडळसिंगी, मादळमोही फाटा, पोखरी फाटा, सिरसमार्ग, पारगाव

▶▶ पान २ वर

# ठाकरे बंधूंची एकी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची नाराजी

## अजित पवारांच्या मंत्र्यांचे राजीनामे अन् भाजप बाहुबली

मुंबई, (दिव्य न्युज):- पौराणिक कथा, चातुर्मासाच्या गोष्टींमध्ये शेवटी 'उतू नका, मातू नका, घेतला वसा टाकू नका' असे लिहिलेले असते. निष्ठेने काम केल्यास फळ नक्की मिळेल, हा त्याचा अर्थ होता. तसेच एखादी गोष्ट मिळाली म्हणून लगेच माजू नका हा त्याचा मतितार्थ असायचा. २०२५ मधील राजकारणावर धावती नजर टाकली राजकीय निष्ठेपेक्षा व्यक्तीनिष्ठा महत्त्वाची दिसली आणि माजुर्डेपणा काय असतो, हे स्वत:ला सामान्य कार्यकर्ता म्हणून घेणाऱ्या नेत्यांकडून रोज पाहायला मिळाले.

▶▶ पान २ वर



नेकनूर : नवनिर्वाचित बीड नगराध्यक्ष व नगरसेवक यांचा नेकनूर ग्रामपंचायत तर्फे व नेकनूर शहराच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी नगराध्यक्ष शेख मुजीब भाई,नवनिर्वाचित नगरसेवक शेख निजाम सरकार,नगरसेवक अशफाक भाई इनामदार नगरसेवक खय्युम भाई इनामदार,नगरसेवक आमेर अण्णा व खाजा बॉस,मुन्ना भाई यांचा नेकनूर ग्रामपंचायत, नेकनूर तर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी नेकनूरचे पठाण फेरोज खान,सय्यद रहीम साहब,असरार भाई,नदीम मंडोला, रिजवान,बाबर खतीब,आबेद बेपारी,सय्यद यासीन,गौस पाशा, शाकेर पत्रकार व ईतर मान्यवर उपस्थित होते.

# प्रचार साहित्यावर नाव अन् संख्या नसेल, तर कारवाई

## जानेवारीनंतर होणार जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका

दिव्य वार्ता

**बीड :** निवडणुकीतील प्रचार साहित्यावर मुद्रक-प्रकाशकाचे नाव आणि संख्या प्रकाशित करणे बंधनकारक आहे. हे न दिल्यास संबंधित प्रिंटिंग प्रेस मालकाला तुरुंगवास, आर्थिक दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

तसेच उमेदवाराने प्रत्येक पत्रक, हस्तपत्रक, घोषणा फलक किंवा भित्तिपत्रके लावण्यापूर्वी त्याची प्रत निवडणूक कार्यालयाकडे सादर करावी लागते.






### पत्रकाची प्रत निवडणूक कार्यालयाकडे सादर करणे अनिवार्य

दस्तऐवज छापण्यात आल्यावर मुद्रकांने प्रतिज्ञापत्राची एक प्रत व पत्रक इत्यादींच्या चार प्रती संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे तीन दिवसाच्या आत सादर कराव्यात. या सर्व प्रती मिडीया सेल मधील कक्षात जमा कराव्यात. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना सहा महिन्यांपर्यंत कारावास किंवा रुपये दोन हजारांपर्यंत दंडाची अथवा या दोन्ही शिक्षा होऊ शकतात, अशी तरतूद या नियमात आहे.

### निवडणुका होतील जाहीर ?

**जिल्ह्यातील** सहा नगर पालिकांसाठी नुकतेच मतदान होऊन मतमोजणी झालेली आहे. आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा कार्यक्रम लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.

**निवडणूक आदर्श** आचारसंहिता काळात संबंधित मुद्रक प्रिंटर्सनी प्रचार साहित्य तसेच इतर छपाई बाबत विशेष काळजी घेऊन आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक असणार आहे.

### मुद्रक-प्रकाशकाचे नाव आणि संख्या छापणे बंधनकारक

हाताने नक्कल काढण्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रक्रियेने छापण्यात किंवा अनेक प्रती काढण्यात आलेले निवडणुकी संबंधीचे प्रत्येक पत्र, हस्तपत्रक, घोषणाफलक किंवा भित्तीपत्रक यांच्या दर्शनी भागावर मुद्रकांचे आणि प्रकाशकाचे नाव व पत्ता प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे.

असे कोणतेही पत्रक मुद्रकाने इच्छुक प्रकाशकाकडून त्यांनी ते स्वत: स्वाक्षरीत केलेले आहे, त्या व्यक्तीला व्यक्तीश: ओळखतील अशा दोन व्यक्तींनी साक्षांकित केलेल्या त्या प्रकाशकांची ओळख पटवणारे प्रतिज्ञापत्र (दोन प्रती मध्ये), तसेच पत्रकांची संख्या छापणे बंधनकारक आहे.

### आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार कुठे कराल ?

आचारसंहिता उल्लंघन झाल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली जाऊ शकते. निवडणुकीतील प्रचार साहित्यावर मुद्रक-प्रकाशकाचे नाव आणि संख्या प्रकाशित करणे कायद्याद्वारे अनिवार्य आहे. या नियमाचे पालन न केल्यास संबंधित मुद्रक मालकाला ६ महिने तुरुंगवास, २ हजार रुपये आर्थिक दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकते. उमेदवारांनी प्रचार साहित्य वितरणापूर्वी निवडणूक कार्यालयांचा अनुमोदन घेणे, सर्व कायदेशीर तरतुदीचे पालन करणे आवश्यक आहे.

# बीडचे विद्रुपीकरण थांबवा!

# अपघातांना आमंत्रण देणारी बॅनरबाजी बंद करा

## कायद्याला हरताळ, न्यायालयाचा अवमान! बीडमध्ये बॅनरबाजीचा कहर; नगरपरिषद कार्यालयासमोर संतप्त निदर्शने

बीड ,(दिव्य न्युज):- बीड शहरातील प्रमुख बाजारपेठा, मुख्य रस्ते व चौकांमध्ये विजेच्या खांबांवर, सिग्नलवर तसेच रस्त्याच्या दुभाजकांवर मोठ्या प्रमाणात लावण्यात आलेल्या अनधिकृत बॅनरमुळे शहराचे विद्रुपीकरण झाले असून वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी बॅनर रस्त्यावर झुकल्याने वाहनचालकांसाठी अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.




शहर स्वच्छता, सौंदर्यीकरण व नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी असलेल्या नगरपरिषदेने जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत कोणतीही ठोस कारवाई न केल्याने अनधिकृत बॅनरबाजीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर 'होर्डिंग्जमुक्तीचा नाशिक पॅटर्न' बीडमध्ये तातडीने राबवावा, अशी मागणी करत सामाजिक कार्यकर्ते व बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज नगरपरिषद कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली.निदर्शकांनी बॅनरबाजी थांबवा अशा घोषणा देत नगरपरिषदेच्या भूमिकेचा निषेध केला. यावेळी शैलेश फडसे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पालकमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन सादर करण्यात आले.

या आंदोलनात माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, शेख मुस्ताक,रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष - इंटक, बीड), आर .आर.जाधव, डी.जी.तांदळे( महाराष्ट्र राज्य किसान सभा बीड जिल्हाध्यक्ष), नितीन जायभाये (अध्यक्ष बीड शहर बचाव मंच),अँड . नितीन वाघमारे , रुक्मिणी नागापुरे सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपालिकांना शहर बॅनरमुक्त ठेवण्याचे स्पष्ट आदेश न्यायालयाने दिले असून त्यानुसार दरवर्षी पालिकांकडून शपथपत्र दाखल करण्यात येते.

▶▶ पान २ वर

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०